वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी ता. परळी, जिल्हा बीड यांनी कोजनरेशन प्रकल्पासाठी एस.डी.एफ. कडून घेतलेल्या रु.२६९४.४० लाख कर्जाचे पुनर्गठन होऊन येणाऱ्या दायित्वास शासनहमी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : शाहमी-२०१९/सपववि/ प्र.क्र.५०/अर्थबळ
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १६ ऑगस्ट,२०१९

वाचा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : शाहमी-१०९९/ प्र.क्र.६८/शा.हमी, दि.५/११/१९९९
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : शाहमी-१००८/ प्र.क्र.१८/ शा.हमी, दि.२८/४/२००८
३) साखर आयुक्त, म.रा. पुणे यांचे पत्र क्र. साआ/उपप/कक्ष-१३/वैद्यनाथ/२०१९ दि. ८/७/२०१९

प्रस्तावना -:

वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड या कारखान्याने एस.डी.एफ. कडून २१ MW सह वीज निर्मिती प्रकल्पासाठी सन २०१२-१३ मध्ये घेतलेल्या रु.२६९४.४० लाख कर्जाची परतफेड न केल्याने सदर कर्जाचे पुनर्गठन करुन येणाऱ्या दायित्वास शासन हमी देण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने दि.२३/७/२०१९ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने शासन हमी देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-:

वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड या कारखान्याने एस.डी.एफ. कडून २१ MW सह वीज निर्मिती प्रकल्पासाठी सन २०१२-१३ मध्ये घेतलेल्या रु.२६९४.४० लाख इतक्या कर्जाचे पुनर्गठन करुन येणाऱ्या दायित्वास शासन हमी देण्यास मान्यता देण्यात येत आहे .

२. सदर शासन हमीवर करण्यात येणाऱ्या कर्जाचे पुनर्गठन करण्याची मुदत ६ महिन्यांची राहील.

३. शासन हमीवर कर्जाचे पुनर्गठन करण्यासंदर्भात धनकोसोबत करण्यात येणा-या करारपत्रात खालील अटी व शर्तींचा समावेश करण्यात यावा.

३.१) शासन हमी रु.२६९४.४० लाख इतक्या कर्जाचे पुनर्गठन करुन येणाऱ्या दायित्वाच्या रकमेपुरती मर्यादित राहील.

३.२) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ कन्झुमर अफेअर्स,फूड अँड पब्लिक डिस्ट्रीब्युशन यांच्या दिनांक १३ मार्च, २०१४ च्या पत्रासोबतच्या एस.डी.एफ. कर्जाच्या पुनर्गठनासंबंधी मार्गदर्शक तत्वातील परिच्छेद (vii) नुसार संपुर्ण दंडनीय व्याजाची रक्कम वगळून कर्जाचे पुनर्गठन करण्यात यावे

३.३) धनकोने वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड या कारखान्याच्या पुनर्गठीत केलेल्या कर्जाच्या परतफेडीचे वेळापत्रक करारपत्रात नमूद करावे व सदर वेळापत्रकात नमूद केलेल्या कालावधीपर्यंतच शासन हमी वैध राहील.

३.४) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड यांनी शासन हमीवरील पुनर्गठित कर्जाचा वापर कर्ज ज्या प्रयोजनासाठी घेतले आहे त्यासाठीच करणे व सह वीज निर्मिती प्रकल्प सुरु ठेवणे बंधनकारक राहील.

३.५) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड हे प्रमुख ऋणको (Principal Debtor) राहतील.

३.६) संबंधित कारखान्यास शासनाचे पुर्व परवानगीशिवाय सदर प्रयोजनासाठी अन्य कोणतेही कर्ज उभारता येणार नाही.

३.७) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड यांनी धनको कडून पुनर्गठन करुन घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यास विलंब झाल्यास त्याकरीता आकारण्यात आलेल्या दंडनीय व्याजाकरीता किंवा इतर कोणत्याही देय रकमेसाठी शासन हमी लागू होणार नाही.

३.८) सदर शासन हमीवरील कर्ज वसुलीकरीता साखरेचा पुरेसा साठा व इतर मालमत्ता तारण / प्रतिभूती म्हणून घेतल्यानंतर कर्जाचे पुनर्गठन करण्यात यावे. साखर साठ्याचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही व साखर साठ्याचे संरक्षण होईल याची व्यवस्था कारखाना करेल. तसेच थकहमीच्या पोटी साखर कारखान्याच्या मत्तेवर भार निर्माण करण्यात यावा.

३.९) कर्जाच्या परतफेडीबाबत होणा-या कसूरीची सुचना शासनास ३० दिवसांच्या आत देणे संबंधित धनकोला बंधनकारक राहील.

३.१०) धनकोने साखर कारखान्याच्या कार्यकारी/संचालक मंडळातील सदस्यांची सामुहिक व वैयक्तिक मालमत्ता तारण म्हणून घेतल्यानंतर कर्जाचे पुनर्गठन करण्यात यावे.

३.११) धनकोने कारखान्याकडून कर्जाची कायदेशीर मार्गाने वसूली करावी व तदनंतर कार्यकारी/संचालक मंडळातील सदस्यांच्या सामुहिक व वैयक्तिक मालमत्तेतून वसुली करण्यात यावी.

३.१२) धनकोने संबंधित कारखान्याकडून कर्ज वसुलीसाठी वरील सर्वतोपरी प्रयत्न केल्याशिवाय धनकोला हमी पूर्ततेकरीता शासन हमीचा प्रतिभूती म्हणून वापर करता येणार नाही. संबंधित कारखान्याच्या चल / अचल मालमत्तेची विक्री अथवा लिलाव करुन वसुली करण्याचा निर्णय धनकोने घेतल्यास, त्याकरीता एक समिती गठीत करण्यात यावी व या समितीमध्ये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग आणि वित्त विभागाचा प्रत्येकी एक प्रतिनिधीचा समावेश करण्यात यावा. विक्री प्रक्रियेचे अंतिमीकरण शासनाच्या मान्यतेने करण्यात यावे.

वरील परि. ३ मधील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास शासन हमी अवैध होईल.

४. वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड यांना रु.२६९४.४० लाख इतक्या कर्जाचे पुनर्गठन करुन येणाऱ्या दायित्वाच्या रकमेस देण्यात आलेली शासन हमी संदर्भाधिन अ.क्र. १ येथील दिनांक ५.११.१९९९ मधील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी तसेच खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहील:-

४.१) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड हे Principal Debtor राहतील.

४.२) सदर धनकोकडून घेण्यात आलेल्या पुनर्गठीत कर्जाचा वापर ज्या प्रयोजनासाठी कर्ज घेण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी करण्यात यावा.

४.३) सदरचे कर्ज (मुद्दल + व्याज) फेडण्याची संपूर्ण जबाबदारी सदर कारखान्याची राहील.

४.४) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ कन्झुमर अफेअर्स,फूड अँड पब्लिक डिस्ट्रीब्युशन दिनांक १३ मार्च, २०१४च्या पत्रासोबत असलेल्या एस.डी.एफ. कर्जाच्या पुनर्गठनासंबंधी मार्गदर्शक तत्वातील परिच्छेद (vii) नुसार संपुर्ण दंडनीय व्याज NCDC कडून माफ करुन घेण्याची जबाबदारी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाची राहील.

४.५) राष्ट्रीय सहकारी विकास निगम (NCDC) च्या कर्जाची परतफेड करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

अ) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना व साखर आयुक्त, महाराष्ट्र यांनी एक स्वतंत्र संयुक्त Escrow Account सुरु करावे. सदर खाते हाताळण्याचे प्राधिकार (Operating Authority) साखर आयुक्त, महाराष्ट्र यांना असतील.

ब) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड या कारखान्याने उत्पादित केलेल्या सह निर्मित विजेची विक्री करुन विज विक्रीपोटी देय असलेल्या रकमेपैकी प्रतिवर्ष रु.५ कोटी किंवा वेळोवेळी NCDC ला परतफेडीसाठी देय वार्षिक रक्कम, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने (MSEDCL) Escrow Account मध्ये जमा करावी. सदर रक्कम NCDC च्या परतफेड वेळापत्रकातील देय हप्त्यापूर्वी जमा होईल याबाबत साखर आयुक्तांनी MSEDCL सोबत समन्वय ठेवावा. तसेच, जर कोजनरेशनचे उत्पादन कमी झाले किंवा झालेच नाही अशावेळी कारखान्याने इतर उत्पन्नातून सदर रक्कम Escrow Account मध्ये जमा केली जाईल याची दक्षता साखर आयुक्तांनी घ्यावी.

क) या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (MSEDCL), वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या .पांगरी, ता. परळी, जि. बीड व साखर आयुक्त यांनी Tripartite करार करावा .

ड) सदर Escrow Account मधून राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) ला त्यांच्या परतफेड वेळापत्रकानुसार (Repayment Schedule) देय कर्जाची रक्कम अदा केली जाईल याची साखर आयुक्तांनी दक्षता घ्यावी.

इ) राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) च्या कर्जाची संपुर्ण परतफेड झाल्यानंतर सदर Escrow Account बंद करण्यात यावे व बंद करतेसमयी सदर खात्यातील शिल्लक रक्कम

वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड या कारखान्यास अदा करावी.

ई) वरील प्रमाणे आवश्यक ती कार्यवाही व सनियंत्रण करण्याची जबाबदारी सहकार विभागाची राहील.

४.६) शासन हमीवर पुनर्गठन करण्यात आलेल्या कर्जाचे दायित्व शासनावर येणार नाही याबाबतची संपुर्ण जबाबदारी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/साखर आयुक्त पुणे यांची राहील.

४.७) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड यांनी दर महिन्याला कर्ज परतफेडीच्या प्रगतीबाबतची स्थिती दर्शविणारी माहिती सहकार, पणन व वस्त्रोद्योग / वित्त विभागाकडे सादर करावी.

४.८) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड यांनी विहित कार्यपध्दतीने लेखा परिक्षित केलेल्या संस्थेच्या लेख्यांची एक प्रत शासनास सादर करावी.

४.९) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड त्यांच्या आर्थिक स्थितीबाबतचा अहवाल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये दर सहा महिन्यांनी (३०मार्च/३०सप्टेंबर) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागास सादर करेल.

५. हमी शुल्क

५.१) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड या कारखान्यास सदर शासन हमीवरील हमीशुल्काचा दर प्र. श.प्र.व. रु.२/- असा राहील.

५.२) हे हमीशुल्क ज्या कालावधीकरिता देय राहील त्या कालावधीतील कोणत्याही दिवशी कमाल अदत्त असलेल्या कर्ज आणि व्याजाच्या एकूण रकमेवर देय राहील.

५.३) हमी शुल्काचा भरणा दर सहा महिन्यांनी करण्यास वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड हे जबाबदार असतील. प्रत्येक वित्तीय वर्षाच्या ३१ मार्च आणि/ अथवा ३० सप्टेंबर रोजी अदत्त असलेल्या कर्जावर देय असलेल्या हमी शुल्काचा भरणा अनुक्रमे १ एप्रिल आणि / अथवा १ ऑक्टोबर रोजी करण्यात यावा.

५.४) देय हमी शुल्क शासन तिजोरीत भरणा करण्यास वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड यांचेकडून कसूर झाल्यास अशा कसूर केलेल्या थकीत रक्कमेवर पहिल्या तीन महिन्यासाठी १६ टक्के दराने व त्या पुढील कालावधीसाठी २४ टक्के दराने व्याज आकारले जाईल.

५.५) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड यांनी शासन हमी शुल्काची रक्कम "८२३५-सर्वसाधारण व इतर राखीव निधी, ११७-हमी विमोचन निधी (८२३५५०४५०१)" या लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करावी.

५.६) हमी शुल्क भरल्याच्या पृष्ठयर्थ चलनाची साक्षांकित प्रत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने वित्त विभागास पाठवावी.

५.७) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड यांनी देय हमीशुल्काचा भरणा केला नाही तर सदर हमीशुल्क सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग तसेच, साखर आयुक्त हे संबंधित कारखान्याकडून वसूल करेल, अन्यथा शासन हमी अवैध ठरेल.

५.८) शासन हमीवरील घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबत व नियत दिनांकास हमीशुल्क वसुल करण्याची व संनियंत्रणाची जबाबदारी सहसचिव/ उपसचिव, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांची राहील.

६. हा शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नस्ती क्र.ससाका-२०१९/प्र.क्र.३३/३ स वरील प्रस्ताव व वित्त विभागाचा शासन हमी क्र.- ४/२०१९-२० नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड यांनी धनकोकडून कर्ज घेण्यासंबंधी करावयाच्या करारपत्रावर स्वाक्षरी करण्याकरिता सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील संबंधीत सहसचिव/ उपसचिव व वित्त विभागातील उप सचिव (अर्थबळ) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८१६१५२६४०५२०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Walter Cajetan Dmello

Digitally signed by Walter Cajetan Dmello
DN: CN = Walter Cajetan Dmello, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Finance Department
Date: 2019.08.16 15:37:23 +05'30'

(वॉल्टर डिमेलो)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपालाचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,
३) मा. उपमुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानभवन सचिवालय, मुंबई (५ प्रती)

१०) बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा इटमेंट, आझाद मैदान, मुंबई,

११) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक्स क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२०

१२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राज भुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४.

१३) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्स्कवादी) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोव मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१

१४) इंडियन नॅशलन कॉंग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई -२५.

१५) नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२१.

१६) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८.

१७) प्रधान सचिव(सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

१८) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे-४११००५.

१९) डेप्युटी डायरेक्टर(शुगर), राष्ट्रीय सहकारी विकास निगम, ४ सीरी इन्स्टीटयूशनल एरिया, हौज खास, नवी दिल्ली, ११००१६.

२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

२१) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

२२) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

२३) कार्यकारी संचालक, वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता. परळी, जि. बीड

२४) वित्त विभाग (ऋण व हमी संनियंत्रण कक्ष/व्यय-२), मंत्रालय, मुंबई-३२.

२५) कक्ष अधिकारी (३ स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२६) निवडनस्ती/ अर्थबळ.

ANNEXURE A

Proforma in which the information in respect of repayment of loan and financial liability of the borrower is to be submitted by the lending institute to the Government every six month (1st April/ 1st Oct)

1 **Name of Lending Institute:**

2 **Principal Debtor:**

3 **Name of Administrative Dept:**

4 **Guarantee No:**

5 **Date of Validity of Guarantee:**

6 **Report for the period from:** **To**

Guarantee & Repayment during the period **(Rupees)**

		Principal	Interest	Total
1	Outstanding guarantee at beginning of the period			
2	Additional guarantee sanctioned, if any during the period			
3	Toal Outstanding (1+ 2)			
4	Repayment of loan			
5	Balance at end of the period (3 - 4)			
6	Amount Credited in to Escrow A/C			
7	Net Balance (5 - 6)			

7 **Payment of Guarantee fees** **(Rupees)**

	Outstanding Amount	G . F.	Penal Fee	Total
1	Outstanding at the Beginning			
2	G. F. Paid (Rs.)			
3	Date			
4	Challan No.			
5	Balance at end of the period (1 - 2)			

8 **Types of assets taken as security against amount of loan / outstanding**

Description Secured	Estimated Value	How
(!)		
(ii)		
(iii)		
Total		

(P.T.O.)

9 Types of inspection of assets / due diligency by lending institute during last 6 months to ensure loans are properly secured.	
10. Financial Health of Principal Debtor (I) Total Turnover of the Principal Debtor (II) Total Profits (iii) % of profits as % of loan amount	
11. Is in the opinion of lending institute,the borrowing institute in a position to service the debt against which government guarantee is given	
12. Is in view of the lending institute, the borrowing institute being managed efficiently	
13. If not, type of corrective action proposed to be taken by lending institute	
14. Has the lending institute ensured that no further loans have been taken by the borrowing institute since the government guarantee was given	
15. Has the lending institute ensured that the guarantee fees has been paid to the Goveernment in order to keep the guareante alive and valid	